रोटी-जन-२८९-११००

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

## <u>परिपत्रक</u>

क्रमांक : एमपीएम/दोन/5188 दि. 25.08.2008

विषय : महानगरपालिका कर्मचाऱ्यांची नियमित बदली करणेबाबत.

संदर्भ : 1) परिपत्रक क्र.एमपीएम/1459 दि.24.9.2001.
2) परिपत्रक क्र.एमपीएम/7536 दि.10.8.2002.
3) परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/1426 दि.7.1.2004.
4) परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/2411 दि.25.5.2004.

सर्व कर्मचाऱ्यांच्या पदनिहाय माहितीचे संगणकीकरण करुन प्रत्येक वर्षी 33 1/3% कर्मचाऱ्यांची बदली करावी असे परिपत्रक क्र.एमपीएम/1459 दि.24.9.2001 अन्वये निदेश दिलेले आहेत. तसेच बदलीचे आदेश प्राप्त झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांना त्वरीत कार्यमुक्त करावे, बदलीचे आदेश प्राप्त झालेल्या कर्मचारी/अधिकारी यांना 3 दिवसाच्या अवधीत कार्यमुक्त न केल्यास त्यांचे वेतन व भत्ते मूळ खात्याच्या आस्थापनेवर काढता येणार नाहीत असे परिपत्रक क्र.एमपीएम/7536 दि.10.8.2002 व परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/1426 दि.7.1.2004 अन्वये निदेश दिलेले आहेत.

यास्तव सर्व खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांनी उपरोक्त संदर्भित परिपत्रकांमधील निदेशांचे काटेकोरपणे पालन करुन एकाच उप विभागात 3 वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक वर्षी 33 1/3% याप्रमाणे बदल्या कराव्यात. विभाग कार्यालयामध्ये/खात्यांमध्ये 10 वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी कार्यरत असलेल्या कर्मचारी/अधिकारी यांची त्वरीत बदली करावी. यापुढे कोणत्याही पदावर (उप विभागात) 3 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कोणताही कर्मचारी/अधिकारी राहणार नाही याची सर्व खाते प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
| ( एस.जे.बाबर ) | ( राजेंद्र वळे ) | (माधव सांगळे ) | ( डॉ. ज. मो. फाटक ) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति. आयुक्त (पूर्व उप.) | आयुक्त |

<u>साप्रवि/08</u>
2008-09

क्र.एमपीएम/दोन/5188
दि. 25.08.2008.

प्रत - ---------------------------------------------- यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण)